संपूर्ण माणदेशात एकाचवेळी प्रसिध्द होणारे एकमेव दैनिक
mandeshexpressatp@gmail.com
दैनिक माणदेशी बुलंद आवाज...
# माणदेश एक्सप्रेस
संपादक : दिपक गौतम प्रक्षाळे
मोबा. ९५९५०४७६७६/९५०३६३८६८६
www.mandeshexpress.com

● वर्ष : ७ वे ● ● अंक : ५१ वा ● ● शनिवार दि. १९ ऑगस्ट २०२३ ● ● किंमत २ रु ● पाने : ४ ● RNI : MAHMAR/2017/77021 Postl Reg : SGL/143/2023-2025


एम एन जाधव (सर) हॉस्पिटल यांचे
श्राव्या डायग्नोस्टिक्स
डिजिटल एक्स-रे सोनोग्राफी सेंटर,आटपाडी
उपलब्ध सुविधा
डॉ.सौ. चैताली सत्येश जाधव (M.B.B.S. D.M.R.E.)
डॉ. सत्येश मधुकर जाधव (M.B.B.S.M.S. D.N.B. F.M.S.)
* सर्व प्रकारचे डिजिटल एक्स-रे * गरोदर मातांची सोनोग्राफी 4 D स्कॅन व गर्भातील बाळांचे व्यंग निदान करणे * पोटाची, छातीची, थायराईड व स्तनाची अत्याधुनिक (हाय रिझोल्यूशन) स्कॅन * वंधत्वसाठीची आणि पाळीच्या समस्या बाबतच्या सोनोग्राफी * इंटरव्हेशनल सोनोग्राफी * सोनोग्राफीद्वारे गाठीचा तुकडा तपासणे, छातीतील किंवा पोटातील पाणी. पु काढणे. तसेच लिव्हर मधील गाठीचा (Abcess) सोनोग्राफीद्वारे उपचार
पत्ता : ग्रामीण रुग्णालयासमोर, आटपाडी

# गौरी गणपती, दिवाळीसाठी १०० रुपयांत आनंदाचा शिधा!

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**मुंबई :** राज्यातील शिधापत्रिकाधारकांना गौरी गणपती, दिवाळीसाठी १०० रुपयात आनंदाचा शिधा देण्याचा निर्णय मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे होते.

प्रत्येकी एक किलो रवा, चणाडाळ, साखर आणि एक लिटर खाद्यतेल असा हा शिधा अंत्योदय अन्न योजना व प्राधान्य कुटुंब शिधापत्रिकाधारक तसेच औरंगाबाद व अमरावती विभागातील सर्व जिल्हे तसेच नागपूर विभागातील वर्धा अशा १४ शेतकरी आत्महत्याग्रस्त जिल्ह्यातील दारिद्र्यरेषेवरील (एपीएल) व केशरी शिधापत्रिकाधारकांना देण्यात येईल. हा शिधा जिन्नस १९ सप्टेंबर रोजी गौरी गणपती उत्सवानिमित्त व त्यानंतर १२ नोव्हेंबरपासून सुरु होणाऱ्या दिवाळी निमित्त वितरित करण्यात येईल. राज्यातील एकूण १ कोटी ६५ लाख ६० हजार २५६ शिधापत्रिकाधारकांना हा आनंदाचा शिधा मिळेल. या खरेदीसाठी घाऊक बाजारातील दर व अनुषंगिक खर्चासह ८२७ कोटी ३५ लाख इतक्या अंदाजित खर्चास मान्यता देण्यात आली. प्रती संच २३९ रुपये या दराने हा शिधा जिन्नस संच खरेदी करण्याचे प्रस्तावित आहे.




तसेच शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमधील प्रशिक्षणार्थ्यांना १९८३ पासून ४० रुपये इतके विद्यावेतन शैक्षणिक साहित्याकरीता व इतर आवश्यक खर्चाकरीता देण्यात येते. या विद्यावेतनात मागील ४० वर्षात कोणतीही वाढ करण्यात आलेली नाही. वाढत्या महागाई दराच्या व शैक्षणिक साहित्यामध्ये खर्चामध्ये झालेल्या वाढीनुसार विद्यावेतनात वाढ करण्याची मागणी सातत्याने लोकप्रतिनिधी व प्रशिक्षणार्थींकडून करण्यात येत होती. या निर्णयामुळे शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमधील अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती व भटक्या जमाती, इतर मागास वर्ग, विशेष मागास प्रवर्ग, अल्पसंख्याक समाजातील व खुल्या प्रवर्गातील आर्थिकदृष्टया मागास घटकातील प्रशिक्षणार्थ्यांना ज्यांचे वार्षिक उत्पन्न ८ लाखांच्या मर्यादेत आहे अशा सर्व प्रवर्गातील प्रशिक्षणार्थ्यांना २०२३-२४ या शैक्षणिक वर्षापासून दरमहा ५०० रूपये इतके विद्यावेतन महाडीबीटी पोर्टलमार्फत देण्यात येईल. याकरिता शासनावर दरवर्षी ७५.६९ कोटीचा आर्थिक भार पडणार आहे.

## शेतीचे साहित्य चोरणारी टोळी अटकेत

### विटा पोलिसांची कारवाई : तीन आरोपींना अटक

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**विटा :** खानापूर तालुक्यातील हिंगणगादे लिफ्ट इरिगेशन स्कीमचे साहित्य चोरणाऱ्या तिघांना अटक करण्यात आली. साच्या क डन एक पिकअप, तीन मोटारी, पाईप असा दोन लाखांचा मुद्देमाल जप्त करण्यात आल्याची माहिती पोलिस निरीक्षक संतोष डोके यांनी दिली. सचिन हिंदुराव मदने (वय २३), शुभम पोपट जाधव (वय २०), आकाश संभाजी भाट (वय १९) सर्व रा. हिंगणगादे अशी अटक केलेल्या आरोपींची नावे आहेत.


**विटा : पोलिसांनी शेतीचे साहित्य चोरी चोरणारी टोळी, सोबत जप्त केलेले साहित्य व तपास करणारे पोलीस अधिकारी, कर्मचारी**

हिंगणगादे इरिगेशन स्कीमचे साहित्य चोरीला गेल्याची फिर्याद विटा पोलिस ठाण्यात दाखल झाली होती. निरीक्षक श्री. डोके यांनी गुन्हे प्रकटीकरण शाखेला तपास करून संशयितांना अटक करण्याचे दिले होते. त्यानुसार पथक माहिती घेत असताना ही चोरी त्या तीन संशयितांनी केल्याची माहिती खबऱ्याद्वारे मिळाली. पथकाने तिघांना ताब्यात घेऊन त्यांच्याकडे सखोल चोकशी केली. त्यानंतर त्यांनी गुन्ह्याची दिली. त्यांच्याकडून गुन्ह्यात वापरलेली पिकअप गाडी, तीन मोटारी, पाईप असा २ लाखांचा मुद्देमाल जप्त केला.

विट्याचे पोलिस निरीक्षक संतोष डोके यांच्या मार्गदर्शनाखाली सहायक निरीक्षक अनिल जाधव, प्रशांत चव्हाण, उत्तम माळी, अमोल कराळे, हेमंत तांबेवाघ, सोमनाथ पाटील, प्रमोद साखरपे, महेश देशमुख, महेश संकपाळ, अक्षय जगदाळे आदींच्या पथकाने ही' कारवाई केली.

## ट्रॅक्टर ट्रॉली चोरणाऱ्या पाचजणांच्या टोळीला अटक

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**सांगली :** सांगली जिल्ह्यासह कर्नाटकातून दुचाकी तसेच ट्रॅक्टर ट्रॉली चोरणाऱ्या पाचजणांच्या टोळीला अटक करण्यात आली. त्यांच्याकडून चोरीच्या सात दुचाकी, एक ट्रॉली असा तब्बल ९ लाखांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. त्यांच्याकडून पाच गुन्हे उघडकीस आणण्यात यश आल्याची माहिती 'एलसीबीचे पोलिस निरीक्षक सतीश शिंदे यांनी दिली.बसवराज बाळाप्पा नाईक (वय २४), ओंकार विष्णू नाईक (वय २१, दोघेही रा. शिवाजीनगर, पलूस, मूळ रा. बोलवाड), ओंकार महेश तांदळे (वय १९, रा. बेडग) सिद्धार्थ पांडुरंग खोत (वय २१), विश्वजित गिरजाप्पा खोत (वय २०, दोघेही रा. विठुरायाचीवाडी, ता. कवठेमहांकाळ) अशी अटक केलेल्यांची नावे आहेत.


**सांगली : ट्रॅक्टर ट्रॉली चोरी करणारी पाच जणांची टोळी, जप्त केलेला मुद्देमाल व सोबत तपास करणारे पोलीस अधिकारी, कर्मचारी**

चोरीतील संशयितांना पकडण्यासाठी एलसीबीचे निरीक्षक श्री. शिंदे यांनी एक विशेष पथक तयार केले होते. हे पथक मिरज परिसरात गस्त घालत असताना ओंकार नाईक आणि बसवराज नाईक यांनी चोरलेल्या दुचाकी बोलवाड (ता. मिरज) येथे ठेवल्याची माहिती पथकातील उपनिरीक्षक कुमार पाटील यांना मिळाली. त्यानुसार पथकाने बोलवाड येथे धाव घेतली. तेथे एका घरासमोर दुचाकी सापडल्या. घरातून आलेल्या दोन तरूणांकडे त्याबाबत कसून चौकशी केली असता त्यांनी त्या दुचाकी सांगली, कुपवाड येथून त्या चोरल्याची कबुली दिली. तसेच 'पथकाला म्हैसाळ उड्डाण पुलाजवळ ओंकार तांदळे चोरीची गाडी विक्री करण्यासाठी येणार असल्याची माहिती मिळाली. पथकाने तेथे सापळा रचून त्याला ताब्यात घेतले. त्याच्याकडे चौकशी केल्यानंतर त्याने म्हैसाळ येथून गाड्या चोरल्याची कबुली दिली.

तसेच पथकाला कवठेमहांकाळ तालुक्यातील विठुरायाचीवाडी येथील सिद्धार्थ, विश्वजित खोत यांनी ट्रॅक्टर ट्रॉली चोरी करून आणली असून त्याच्या विक्रीसाठी ते आल्यानंतर पथकाने सापळा रचून त्यांना अटक केली. त्यांच्याकडे कसून चौकशी केल्यानंतर त्यांनी तो ट्रॅक्टर कर्नाटकातील कुडची येथून चोरल्याची कबुली दिली. सर्व संशयितांकडून ९ लाखांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. 'एलसीबीचे पोलिस निरीक्षक सतीश शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली सहायक निरीक्षक पंकज पवार, उपनिरीक्षक कुमार पाटील, आमसिद्ध खोत, अमर नरळे, सागर टिंगरे, अनिल कोळेकर, विक्रम खोत, अजय बेंद्रे, सुनील जाधव, कॅप्टन गुंडवाडे आदींच्या पथकाने ही कारवाई केली.

## कडेपूरचे कॉलेज नॅकच्या पुनर्मुल्यांकनासाठी सज्ज

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**कडेपूर :** येथील स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे आर्टस् अँड कॉमर्स कॉलेज नॅकचे पुनर्मुल्यांकन दि.२१ व २२ ऑगस्ट २०३३ रोजी संपन्न होणार आहे. सदर पुनर्मुल्यांकन करण्यासाठी अध्यक्ष म्हणून हरियाणा येथिल गुरु जांभेश्वर तंत्रज्ञान आणि विज्ञान विद्यापीठ, हिस्सार व चौधरी देवी लाल विद्यापीठ, हरियाणा येथील माजी कुलगुरू डॉ. राधेश्याम शर्मा, तर समन्वयक म्हणून ओडिसा स्टेट ओपन विद्यापीठ, ओरिसा येथिल माजी कुलगुरू डॉ. अर्का कुमार दास महापात्रा आणि सदस्य म्हणून केरळ येथील कॅथालिकेट महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. मॅथ्यू पी. जोसेफ यांची तज्ज्ञ समिती महाविद्यालयाला भेट देणार आहे.



**कडेपूर : नॅक पुनर्मुल्यांकनासाठी सज्ज असलेले कडेपूर येथील आर्ट्स अँड कॉमर्स कॉलेज**

१९८४ साली स्थापन झालेले आर्टस् अँड कॉमर्स कॉलेज, कडेपूर हे कडेगांव तालुक्यातील व सांगली जिल्ह्यातील एक अग्रगण्य असे महाविद्यालय आहे. कडेगांव व कडेपूर परिसरातील सर्व सोयींनी परिपूर्ण असणारे आणि विद्यार्थ्यांना आधुनिक शिक्षण देणारे नामांकित महाविद्यालय म्हणून आर्टस् अँड कॉमर्स कॉलेज चा नावलौकिक आहे. महाविद्यालयामध्ये कला, वाणिज्य याबरोबरच रोजगाराभिमुख व्यावसायिक शिक्षण दिले जाते. यापूर्वी झालेल्या नॅक पुनर्मुल्यांकनामध्ये महाविद्यालयाने बी प्लस ही ग्रेड मिळविली होती. नॅक पुनर्मुल्यांकनाच्या दृष्टीने महाविद्यालयातील सर्व विषयांच्या विभागातील, कार्यालयातील तसेच महाविद्यालय सुशोभीकरणाची सर्व कामे पूर्ण झाली आहेत.

दि.२१ व २२ ऑगस्ट रोजी संपन्न होणाऱ्या नॅक पुनर्मुल्यांकनामध्ये महाविद्यालय यशस्वी कामगिरी करेल अशी माहिती अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे प्रमुख डॉ.दत्तात्रय थोरबोले, त्यांचे सहकारी प्रा. दिलीप पवार व महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बापूराव पवार यांनी दिली.

## मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालयातर्फे राजकीय पक्षांची बैठक

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**मुंबई :** विशेष संक्षिप्त पुनरीक्षण कार्यक्रमांतर्गत राबवण्यात येणाऱ्या विविध उपक्रमांची माहिती देण्यासाठी महाराष्ट्राच्या मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालयातर्फे नोंदणीकृत राजकीय पक्षांची बैठक आयोजित करण्यात आली होती. अपर मुख्य सचिव आणि मुख्य निवडणूक अधिकारी श्रीकांत देशपांडे यांनी या बैठकीला संबोधित केले. त्यांनी १७ ऑक्टोबर ते ३० नोव्हेंबर या कालावधीत राबविल्या जाणाऱ्या विशेष संक्षिप्त पुनरीक्षण कार्यक्रमाची माहिती दिली. तसेच नवमतदार नोंदणी, नाव वगळणी, नाव-पत्ता-लिंग इ. तपशिलांतील दुरुस्त्या यांची सद्यःस्थिती सांगण्यात आली. महाविद्यालयीन विद्यार्थी, तृतीयपंथी समुदाय, दिव्यांग व्यक्ती यांच्यासाठी राबवण्यात येणाऱ्या विशेष शिबिरे आणि ग्रामसभा यांची माहिती देण्यात आली.

राजकीय पक्षांच्या प्रतिनिधींना मतदान केंद्रस्तरीय सहाय्यक (बूथ लेवल असिस्टंट - बीएलए) नेमण्यास सांगण्यास आले. तसेच या साहाय्यकांनी मतदारसंघ पातळीवर मतदान केंद्रस्तरीय अधिकाऱ्यांना (बूथ लेवल ऑफिसर यांना) सहकार्य करण्याचे आवाहन करण्यात आले. इलेक्ट्रॉनिक मतदानयंत्राच्या प्रथमस्तरीय तपासणी सत्रांविषयी उपस्थित पक्षांच्या प्रतिनिधींना अवगत करण्यात आले. श्री.देशपांडे यांनी उपस्थितांच्या सर्व शंकांच निरसन केले. त्यांनी राजकीय पक्षांच्या नेत्यांनी, पदाधिकाऱ्यांनी प्रत्यक्ष तसेच समाजमाध्यमांवरून नवमतदारांना नाव नोंदणी करण्यास सांगावे, असे आवाहन केले.

सदर बैठकीला सहमुख्य निवडणूक अधिकारी मनोहर पारकर उपस्थित होते. तसेच आम आदमी पार्टी, बहुजन समाज पार्टी, भारतीय जनता पार्टी, शिवसेना, शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे), महाराष्ट्र नवनिर्माण सेना, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी, भारतीय राष्ट्रीय काँग्रेस या पक्षांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

भाऊ
कन्स्ट्रक्शन
बिल्डर्स & डेव्हलपर्स
9004792356
- उत्कृष्ट,दर्जेदार आणि मजबूत पध्दतीचे कामे.
- सर्वांच्या पसंतीत आणि विश्वासात नं.१ चे स्थान असलेले.

## विद्यार्थ्यांनी नवनवीन कौशल्ये आत्मसात करावीत

### डॉ. अमित याळगी : वसंतरावदादा पाटील महाविद्यालयात सीपीबीएफआय कोर्सचा शुभारंभ

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**तासगाव :** कॉर्पोरेट क्षेत्रातील नोकरीच्या संधी तरुणांना खुणावतात. विद्यार्थ्यांनी नवनवीन कौशल्ये आत्मसात करून व्यक्तिमत्त्वाचा विकास करावा असे उद्गार डॉ. अमित याळगी यांनी पद्मभूषण डॉ.वसंतरावदादा पाटील महाविद्यालय, तासगाव येथे अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष, वाणिज्य विभाग आणि बजाज फिन्सर्व लिमिटेड यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित केलेल्या सर्टिफिकेट प्रोग्राम इन बँकिंग फायनान्स अँड इन्शुरन्स या कोर्सच्या उद्घाटन प्रसंगी बोलताना काढले.

पुढे बोलताना ते म्हणाले, पॉझिटिव्ह विचार केला तर कामं खूप सोपी होतात. स्वतःमध्ये सुधारणा करा, मुलाखतीची तंत्र आत्मसात करून आत्मविश्वासाने सामोरे जावे, कठोर परिश्रम केल्यास यश निश्चित मिळेल हा विश्वास त्यांनी दिला. या कोर्सच्या माध्यमातून कार्पोरेट क्षेत्रासाठी आवश्यक असणारी सर्व कौशल्य देण्याचा प्रयत्न केला जातो त्यामुळे विद्यार्थ्यांनी या संधीचा फायदा घ्यावा. हा कोर्स पूर्ण करून बँकिंग व फायनान्स क्षेत्रामध्ये नोकरी मिळविलेल्या शितल पवार, अभिजीत माने, अक्षय सुतार, शिवानी गायकवाड, अवधूत जाधव यांनी या कोर्स चे महत्व सांगून आपले अनुभव कथन केले.



**तासगाव : वसंतरावदादा पाटील महाविद्यालयात सीपीबीएफआय कोर्सचा शुभारंभ प्रसंगी मार्गदर्शन करताना डॉ. अमित याळगी, मंचावर उपस्थित प्राचार्य डॉ. मिलिंद हुजरे**

प्राचार्य डॉ.मिलिंद हुजरे यांनी वाणिज्य विभागाने राबवलेल्या उपक्रमांचे कौतुक केले. विद्यार्थ्यांना जास्तीत जास्त नोकरीच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी महाविद्यालय प्रयत्नशील असल्याचे सांगितले व बजाज फिन्सर्व लिमिटेड यांचे त्यांनी सदरचा कोर्स ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना उपलब्ध करून दिल्याबद्दल धन्यवाद मानले. सदर कोर्ससाठी वाणिज्य विभागातून १५७ विद्यार्थ्यांनी नोंदणी केल्याचे त्यांनी नमूद केले.

कार्यक्रमास डॉ. अमोल सोनवले, प्रा.जी. आर.पाटील, प्रा.स्वप्निल पाटील, डॉ.एस.एस. परचुरे, उपप्राचार्य जे.ए.यादव, प्रा.आण्णासाहेब बागल, प्रा.नेहा मोरे,ड. निलेश कुंभार यांसह महाविद्यालयातील प्राध्यापक विद्यार्थी -विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# संपादकिय

## राज्यकर्त्यांच्या भूमिकेने शेतकरी अडचणीत!

ङ्गशेतकरी' हा शब्द जरी कानावर पडला तरी आपल्या अंगाला काटे आल्यासारखे वाटते. राज्यात किमान दररोज एक तरी शेतकरी आत्महत्या करतो. जो शेतात रात्रंदिवस काबाड कष्ट करतो म्हणजे सतत काम करत असतो. आणि आपल्या साठी दोन वेळेचं अन्न पिकवतो तो शेतकरी. शेतकरी राजा खूप काबाड-कष्ट करत असला तरी त्याला सुख मिळत नाही. त्याच्या वाटेला नेहमी दु:खाचे डोंगर उभे राहतात. थोडक्यात शेतकऱ्याचे चित्र डोळ्यासमोर आणा, आपल्याला त्याचा काळा खुट्ट चेहरा, त्याचे मळलेले कपडे, त्याचे डोक्याचे वाढलेले केसं, त्याचा फाटलेला बनियान, गळ्यात मळलेला रुमाल असं व्यक्तिमत्त्व आपल्या डोळ्यासमोर लगेच उभं राहील.

भारत देश हा कृषी प्रधान देश. जगामध्ये भारताची ओळख सुद्धा कृषी प्रधान देश म्हणूनच केली जाते. परंतु त्याच देशातील शेतकरी मात्र, राज्यकर्त्यांच्या भूमिकेने अडचणीत सापडत आहे. त्यामुळे शेतकऱ्यांच्या अडचणीला राज्यकर्ते हेच जबाबदार आहेत, हे राजकीय लोकांना माहिती असून सुद्धा त्यांची भूमिका ही संदिग्ध असल्याने शेतकरी अडचणीत सापडत आहे.

सध्या पिकांच्या लागणीचा कार्यक्रम सुरु असून अनेक ठिकाणी पिकांना लागणारा युरिया खत उपलब्ध होत नाही. या खताची कृत्रिम टंचाई निर्माण केली जात असल्याच्या शेतकऱ्यांच्या तक्रारी आहेत. खरीप पिकांसाठी शेतकऱ्यांच्या मागणीप्रमाणे युरिया खताचा पुरवठा करण्यात यावा, आवश्यक साठा उपलब्ध ठेवून कृषी विभागाने कोणतीही कुचराई करू नये, खताचे महिनानिहाय नियोजन करून कृत्रिम टंचाईवर नियंत्रण ठेवा, अशा सूचना खुद्द कृषिमंत्री देत असले तरी याला मात्र अधिकारी वर्गाकडून म्हणावी तशी दाद मिळत नसल्याने व अधिकारी, खत निर्मिती कारखाने व दुकानदार यांची चेन असल्याने यामुळे शेतकरी अडचणीत सापडत आहे. राज्यामध्ये काही जिल्ह्यात पावसाने दडी मारल्याने यंदा उशिरा पेरणी झाली. काही भागात अतिवृष्टीमुळे शेतकरी वर्ग हवालदिल झाला. खरीप पिकांची निगा राखण्यासाठी शेतकरी जोमाने कामाला लागले. युरिया खताची मागणी मोठ्या प्रमाणावर आहे. शेतकऱ्यांना युरियाच्या कृत्रिम टंचाईचा देखील सामना करावा लागत आहे. शेतकऱ्यांना युरिया खताची कमतरता जाणवणार नाही, अशी माहिती कृषी अधिकारी देत असले तरी, खत उत्पादक कंपन्यांकडून मंजूर उपलब्धतेनुसार खताचा पुरवठा होत नसल्यास त्या खत कंपन्यांवर कायदेशीर कारवाई करण्याच्या देवून अधिकारी, मंत्री यांच्यावर कारवाई केली तरच हे सुतासारखे सरळ होतील. शेतकऱ्यांची युरिया खतासाठी सातत्याने होत असलेली मागणी, खतपुरवठा व खरीप हंगामातील युरिया खताच्या महिनानिहाय मागणीचे कटाक्षाने नियोजन करण्यात करावे असे ना अधिकारी यांना वाटते ना राज्यकर्ते यांना, त्यामुळे अधिकारी व राज्यकर्ते यांच्या कात्रीत सापडून शेतकरी मात्र अडचणीत सापडत चालला आहे.




# लम्पी चर्म रोग प्रतिबं क्षेत्र म्हणून सांगली घोषित

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**सांगली :** लम्पी चर्म रोग या अनुसूचित रोगाचा प्रतिबंध, नियंत्रण, निर्मुलन करण्यासाठी जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी डॉ. राजा दयानिधी यांनी प्राण्यामधील संक्रमक व सांसर्गिक रोगास प्रतिबंध व नियंत्रण अधिनियम २००९ आणि महाराष्ट्र शासन अधिसूचना दि. १७ जून २०२२ अन्वये प्राप्त अधिकारानुसार संपूर्ण सांगली जिल्हा नियंत्रित क्षेत्र म्हणून घोषित करून पुढीलप्रमाणे आदेश दिले आहेत.

सांगली जिल्ह्यात लम्पी चर्मरोगावर नियंत्रण, प्रतिबंध किंवा त्याचे निर्मुलन करता येईल आणि गोजातीय प्रजातीची सर्व गुरे म्हशी यांची ज्या ठिकाणी ते पाळले (ठेवले) जातात, त्या ठिकाणापासून नियंत्रित क्षेत्रातील किंवा त्या क्षेत्र बाहेरील अन्य कोणत्याही ठिकाणी ने आण करण्यास मनाई करण्यात येत आहे. यापूर्वी शर्यतीला परवानगी दिली असल्यास या आदेशान्वये सदर शर्यत परवानग्या रद्द होतील. गोजातीय प्रजातीची गुरे व म्हशीचा कोणताही बाजार भरवणे, प्राण्याच्या शर्यत लावणे, बैल गाडी शर्यत आयोजित करणे, प्राण्यांची जत्रा भरवणे, प्राण्यांचे प्रदर्शन आयोजित करणे आणि नियंत्रित क्षेत्रात गोजातीय प्रजातींच्या प्राण्यांचे गट करून किंवा त्यांना एकत्रित करून कोणताही कार्यक्रम पार पाडणे यास मनाई करण्यात येत आहे. नियंत्रित क्षेत्रामधील बाजार पेठेत, जत्रेत, प्रदर्शन किंवा प्राण्यांच्या अन्य जमाव मध्ये किंवा कोणत्याही सार्वजनिक ठिकाणी गोजातीय प्रजाती प्राण्यांच्या उक्त बाधित झालेल्या गुरांना व म्हशींना आणणे किंवा आणण्याचा प्रयत्न करणे यास मनाई करण्यात येत आहे. जनावारांचा बाजार भरविण्यास मनाई करण्यात येत आहे. साथीच्या काळात बाधीत भागातील जनावरे व मानवाचा निरोगी भागात प्रवेश प्रतिबंधीत करण्यात येत आहे. तसेच बाधीत गांवामध्ये बाधीत जनावरांच्या पिण्याच्या पाण्याकरिता व चराई करिता पशुपालकांनी स्वतंत्र व्यवस्था करावी.

रोग प्रादुर्भावग्रस्त क्षेत्रामध्ये व रोग प्रादुर्भावग्रस्त क्षेत्रा मधून पशुधनाची ऑनलाईन पध्दतीने होणारी खरेदी विक्री व प्रत्यक्ष वाहतूक प्रतिबंधित करण्यात येत आहे. गायी व म्हशींना स्वतंत्र ठेवणे, बाधीत व अबाधीत जनावरे वेगळी बांधणे तसेच या रोगाने ग्रस्त जनावरांचा मृत्यू झाल्यास मृतदेहाची शास्त्रीय पध्दतीने पशुपालकांनी विल्हेवाट लावावी. बाधीत परिसरात स्वच्छता व निर्जंतूक द्रावणाची फवारणी करुन निर्जंतूकीकरण करावे व रोगप्रसारास कारणीभूत असलेल्या डास, माशा, गोचीड इत्यादीच्या नियंत्रणासाठी औषधांची फवारणी करावी. लंम्पी चर्मरोगाचा विषाणू वीर्यामधूनही बाहेर पडत असल्यामुळे वीर्य मात्रा बनविणाऱ्या संस्था मार्फत होणारे वीर्य संकलन थांबवावे व वळुंची चाचणी करुन रोगाकरिता नकारार्थी आलेल्या वळुंचे वीर्य संकलन करणे किंवा नैसर्गिक संयोगा करिता वापर करावा. लंम्पी चर्मरोगाचा प्रादुर्भाव व प्रसार थांबविण्यासाठी सांगली जिल्ह्यातील सर्व ग्रामपंचायती, नगरपंचायती, नगरपरिषदा व महानगरपालिका यांचे मार्फत त्यांचे कार्यक्षेत्रातील भटक्या पशुधनाचे नियमित निरिक्षण करण्यात यावे तसेच बाधीत पशुधनाची काळजी घ्यावी व कीटक नाशक फवारणी मोहीम स्वरुपात राबविण्यात यावी.

कायद्याशी सुसंगत कृती न करणाऱ्या आणि कायद्याच्या अंमलबजावणी मध्ये अडथळा निर्माण करणाऱ्या पशुपालक, व्यक्ती, संस्था प्रतिनिधी यांच्या विरुध्द नियमानुसार गुन्हा दाखल करणे तसेच कारवाई प्रस्तावीत करण्यासाठी त्या त्या क्षेत्रातील पशुधन विकास अधिकारी यांना प्राधिकृत करण्यात येत आहे, असे आदेश जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी डॉ. राजा दयानिधी यांनी जारी केले आहेत.

पशुधनामध्ये लम्पी चर्म रोगाची लागण झाल्याचे रोग निदान अहवाल प्राप्त झालेले आहेत. राज्याचे महसूल, पशुसंवर्धन, दुग्ध व्यवसाय विकास मंत्री यांनी व्ही.सी व्दारे लम्पी चर्मरोग या अनुसूचित रोगाचा प्रतिबंध, नियंत्रण, निर्मुलन करण्यासाठी नियंत्रित क्षेत्र घोषित करणे व जनावरांचे बाजार बंद करण्याबाबत सूचित केले आहे.

लम्पी चर्मरोग जिल्हास्तरीय सनियंत्रण समिती सभेमध्ये लम्पी चर्मरोगाचा वाढता प्रादुर्भाव कमी करण्यासाठी संपूर्ण सांगली जिल्हा नियंत्रित क्षेत्र घोषित करणे आवश्यक आहे या निष्कर्षापर्यंत आलेली आहे. तसेच एका राज्यातून दुसऱ्या राज्यात, एका जिल्ह्यातून दुसऱ्या बाधित जिल्ह्यात जनावरांची वाहतूक केल्यामुळे बाधित जनावरापासून निरोगी जनावरांना या रोगाचा प्रादुर्भाव होण्याची दाट शक्यता आहे. हा रोग विषाणूजण्य सांसर्गिक रोग असल्याने या रोगाचा प्रसार होऊ नये म्हणून सांगली जिल्ह्यात प्रतिबंधात्मक उपाययोजना राबविणे आवश्यक आहे.

त्याअनुषंगाने जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी डॉ. राजा दयानिधी यांनी लम्पी चर्म रोग या अनुसूचित रोगाचा प्रतिबंध, नियंत्रण, निर्मुलन करण्यासाठी संपूर्ण सांगली जिल्हा नियंत्रित क्षेत्र म्हणून घोषित करून प्रतिबंधात्मक उपाययोजना राबविण्यासाठी आदेश जारी केले आहेत.




# लम्पी चर्मरोग; फवारणी व लसीकरणास प्राधान्य द्या : डॉ. राजा दयानिधी

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**सांगली :** जिल्ह्यात लम्पी चर्मरोग प्रादुर्भाव वाढू नये यासाठी नियमित फवारणीसह गोवंशीय पशुधनाचे तातडीने लसीकरण पूर्ण करावे, अशा सूचना जिल्हाधिकारी डॉ. राजा दयानिधी यांनी दिल्या.



लम्पी चर्मरोगाबाबत जिल्हास्तरीय सनियंत्रण समितीची जिल्हाधिकारी डॉ. राजा दयानिधी यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हाधिकारी कार्यालयात बैठक झाली. बैठकीस जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त डॉ. अजयनाथ थोरे, जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी डॉ. किरण पराग, जिल्हा अधीक्षक विवेक कुंभार, सहायक निबंधक उर्मिला राजमाने आदि उपस्थित होते.

जिल्हाधिकारी डॉ. राजा दयानिधी म्हणाले, जिल्ह्याच्या काही भागात लम्पी चर्मरोग प्रादुर्भाव जाणवत आहे. यासाठी वेळीच प्रतिबंधात्मक उपाययोजना करणे आवश्यक आहे. जिल्ह्याच्या ज्या भागात लम्पी चर्मरोग प्रादुर्भाव जाणवत आहे त्या ठिकाणी लसीकरण प्राधान्याने पूर्ण करावे. बाधित जनावरांचे आयसोलेशन, औषधोपचार, लसीकरण याबाबत आवश्यक खबरदारी घेऊन पशुपालकांमध्ये जनजागृती करावी. लसीकरण व फवारणीसाठी पथके कार्यरत ठेवावीत. लम्पी चर्मरोग प्रादुर्भाव रोखण्यासाठी जनावरांचे बाजार बंद करणे, शर्यती बंद करणे, जनावरांची वाहतूक बंद करणे आदी उपाय योजना राबविण्यात याव्यात, अशा सूचना जिल्हाधिकारी डॉ. राजा दयानिधी यांनी दिल्या.

## अठराशे सत्तावन्नचा उठाव

भारतीयांनी १८५७ मध्ये इंग्रजी सत्तेविरुद्ध केलेला उठाव. काही इतिहासकार या उठावास बंड म्हणतात, तर काही त्यास स्वातंत्र्ययुद्ध म्हणून गौरवितात. १८५७ च्या उठावामागे राजकीय, आर्थिक, सामाजिक, धार्मिक व लष्करी अशी अनेकविध कारणे होती.

१८५७ पूर्वी डलहौसी या गव्हर्नर जनरलने आसाम, कूर्ग, सिंध, पंजाब व ब्रह्मदेशातील पेगू हे प्रांत हस्तगत केले होते; गादीचे दत्तक वारस नामंजूर करून सातारा, झाशी, नागपूर, ओर्च्छा, जैतपूर, संबळपूर अशी संस्थाने खालसा केली; त्याच मुद्द्यावर दुसऱ्या बाजीरावाचा दत्तक मुलगा नानासाहेब याचा तनखा बंद केला; अव्यवस्थित कारभाराच्या निमित्ताने डलहौसीने अयोध्येचे राज्य व निजामाचा वऱ्हाड प्रदेश ताब्यात घेतला. त्यामुळे लहानमोठ्या सर्व संस्थानांत असंतोष निर्माण झाला होता.

संस्थाने खालसा झाल्यामुळे त्यांच्यावर अवलंबून असलेले लोक व सैनिक बेकार झाले. १८३३ पासून १८५७ पर्यंत इंग्रजांनी साम्राज्य-विस्तारासाठी अनेक युद्धे केली. या युद्धांचा खर्च हिंदी जनतेवर डोईजड कर बसवून वसूल केला होता. पाश्चात्त्य वस्तूंवरील आयात कर माफ केल्यामुळे इंग्रजी मालाला उठाव मिळाला व देशी उद्योगधंदे बंद पडले.

हिंदुस्थानचे दारिद्र्य वाढले. इंग्रजी अंमलात जमीनदार, वतनदार, शेतकरी यांचे हाल झाले. ईस्ट इंडिया कंपनीच्या अधिकाऱ्यांनी दुष्काळ, अवर्षण यांचा विचार न करता जमिनीची पहाणी करून जमीनमहसुलाचे कमाल आकार ठरवून दिले. जमिनीच्या मालकाकडे सरकारी देणे राहिल्यास कंपनीचे अधिकारी जमिनी जप्त करीत किंवा विकून टाकीत. यामुळे शेतकरी व जमीनदार यांचे हाल झाले. जमिनीच्या साऱ्यासंबंधीच्या नवीन नियमांनुसार सरकार व शेतकरी यांच्यामधील मध्यस्थ काढून टाकल्यामुळे तालुकदारांना काम उरले नाही. १८५२ मध्ये डलहौसीने सरदार, इनामदार यांचे हक्क तपासण्यासाठी नेमलेल्या इनाम आयोगाने बत्तीस हजार इनामांची चौकशी केली. मालकीचा पुरावा नसलेल्या एकवीस हजार वतनदारांची वतने जप्त केली. वारस नाही म्हणून आंग्रे यांचे संस्थान खालसा केले.

कंपनी सरकार व हिंदी सैनिक यांत बरेच दिवस तेढ निर्माण झाली होती. या उठावापूर्वी हिंदी सैनिकांनी १८०६ पासून १८५० पर्यंत वेलोर, बरेली, बराकपूर, जबलपूर, फिरोझपूर इ. ठिकाणी बंडे केली होती. हिंदी सैन्याच्या बळावर इंग्रजांनी आपली सत्ता बळकट करून साम्राज्यविस्तार केला होता. परंतु पदव्या व बक्षिसे मात्र इंग्रज अधिकाऱ्यांनाच दिली जात. हिंदी सैनिकांना दूरवरच्या आघाड्यांवर जाण्यासाठी दिलेला जादा भत्ता बंद केला होता. १८५७ च्या सुमारास ब्रिटिशांचे हात यूरोप, चीन आणि इराण येथील युद्धांत गुंतले असल्यामुळे कलकत्ता ते अलाहाबाद या प्रदेशात फक्त एकच यूरोपीय पलटण होती. मुख्य लष्करी ठाणी हिंदी सैन्याच्या हातात होती. कंपनी सरकारचे राज्य हिंदी सैन्यावर अवलंबून आहे, अशी समजूत लष्करात पसरली. यातच १८५६ मध्ये कॅनिंगने सैन्यातील शिपायांनी हिंदुस्थानच्या बाहेर गेले पाहिजे, असा हुकूम काढला. या असंतोषातच काडतूस-प्रकरणाने प्रक्षोभ निर्माण केला. हिंदूंना पवित्र असलेल्या गायीची किंवा मुसलमानांना निषिद्ध असलेल्या डुकराची चरबी काडतुसांना लावलेली असल्यामुळे हिंदू व मुसलमान यांच्या भावना दुखावल्या गेल्या.




अठराशे सत्तावनच्या जानेवारी-फेब्रुवारी महिन्यांत डमडम व बराकपूर येथे काडतूस-प्रकरणावरून गडबड झाली. मीरत येथील शिपायांनी नवी काडतुसे वापरण्याचे नाकारल्यामुळे त्यांना कैद केले गेले. शिपायांनी सरकारी इमारती जाळण्यास सुरुवात केली. २९ मार्च १८५७ रोजी मंगल पांडे व इंग्रज अधिकारी ह्यांच्यात चकमक झाली. मंगल पांडे यास पकडून ८ एप्रिल १८५७ रोजी फाशी देण्यात आले. येथूनच उठावास सुरुवात झाली. हा उठाव सप्टेंबर १८५८ पर्यंत चालू राहिला. या काळात बराकपूर, लखनौ, मीरत, दिल्ली, लाहोर, फिरोझपूर, अलीगढ, पेशावर, मथुरा, झाशी, आग्रा, बरेली, कानपूर, अलाहाबाद इ. ठिकाणी लहानमोठ्या प्रमाणात गडबडी झाल्या. या उठावाचे महाराष्ट्रातही पडसाद उठले. इंग्रजी सत्ता खिळखिळी करण्यासाठी व साताऱ्याच्या गादीचे पुनरुत्थान करण्यासाठी सातारकरांचा वकील रंगो बापूजी याने सातारा, पुणे, कोल्हापूर येथे गुप्त कारस्थाने सुरू केली. नानासाहेब पेशव्याचे दूत ग्वाल्हेरचे ज्योतिराव घाटगे व निंबाळकर यांनी कोल्हापूरात उठाव केला. इंग्रजांनी हा उठाव मोडून काढला.

उत्तरेत उठावातील लोकांनी प्रथम दि. ११-५-१८५७ रोजी दिल्ली ताब्यात घेतली. बहादुरशहाला हिंदुस्थानचा बादशहा म्हणून जाहीर केले. परंतु थोड्याच दिवसांत लॉरेन्सने दिल्ली पुन्हा सोडवून घेतली. ऊट्रम व हॅवलॉक यांनी लखनौ येथील उठाव मोडले. ड्यूरंडने माळव्यातील उठावाचा बंदोबस्त केला. मार्च १८५८ मध्ये इंग्रजांनी झाशीला वेढा दिला. ह्यू रोझ व झाशीची राणी लक्ष्मीबाई यांच्यात लढाई होऊन इंग्रजांनी झाशीचा कबजा घेतला. पुढे राणी लक्ष्मीबाई व तात्या टोपे दोघे ग्वाल्हेर येथे इंग्रजांविरुद्ध लढले.

लढाईत लक्ष्मीबाई मरण पावली. दि. २१-१-१८५९ रोजी राजपुतान्यात सीकार येथे तात्या टोपे व इंग्रज यांच्यात झालेल्या लढाईत तात्या टोपेचा पराभव झाला, तो पकडला गेला. दि. १८-४-१८५९ ला त्यास इंग्रजांनी फाशी दिले. नानासाहेब व इंग्रज यांच्यात कानपूर येथे लढाई झाली. नानासाहेब रोहिलखंडाच्या बाजूस गेला असता इंग्रजांनी त्याचा पाठलाग केला. कॅंबेल याने रोहिलखंडातील उठाव मोडला.

नानासाहेबास पकडण्यासाठी इंग्रजांनी ५० हजारांचे बक्षीस जाहीर केले. नानासाहेब व हजरत बेगम हे नेपाळात निघून गेले असावेत. बहादुरशहास इंग्रजांनी कैद करून रंगूनला पाठविले. या उठावात शिंदे, निजाम, भोपाळच्या बेगमा, नेपाळचा राणा जंग बहादूर यांनी इंग्रजांना मदत केली. पंजाबमधील शीख, काश्मीरचा राजा व कित्येक जमीनदार इंग्रजांशी एकनिष्ठ राहिले.

इंग्रजाच्या ताब्यात आलेल्या वऱ्हाड प्रांतात या बंडाच्या काळात पूर्ण शांतता होती. १८५७ उठावाचा वीर सेनानी तात्या टोपे हा १८५८ मध्ये मध्य भारतातून मेळघाट विभागात आला व त्याने तेथील भिल्ल, कोरकु, गोंड या लोकांना इंग्रजाविरुध्द चिथावले. कॅप्टन मेडोज टेलर हा त्यावेळी या विभागाचा डेप्युटी कमिशनर होता. त्याने मेळघाटच्या राजाच्या इंग्रज भक्तीबद्दल प्रशंसा केली आहे. पुढे अमरावतीला एकत्र झालेली इंग्रजांची फौज घेऊन ब्रिगेडीयर हील हा गाविलगडला गेला आणि कॅप्टन स्कॉटला त्याने वरुडच्या दिशेने पाठविले. बंडवाल्यापासून अमरावतीचे संरक्षण करावे म्हणून इंग्रजांनी अमरावतीचे सभोवार प्रचंड फौज आणि तोफा उभ्या केल्या होत्या. १८५७ च्या बंडानंतर सर्वत्र धरपकड सुरु झाली. बंडवाल्या लोकांबरोबर साधु. वैरागी, सन्याशी अशाही लोकांना संशयित म्हणून कंपनी सरकारने पकडल्याचा सपाटा सुरु केला. त्याला कारणही तसेच होते. बंडात भाग घेणारे कित्येकजन आपण पकडले जाऊ नये म्हणून वेश बदलून साधु-सन्यासी बनले होते. १८५७ चा उठाव फसल्यानंतर वेश पालटून अनेक संबंधित व्यक्ती देशभराच्या कानाकोपऱ्यात निघून गेल्या होत्या.

हा उठाव यशस्वी होऊ शकला नाही; कारण उठावातील लोकांच्या पुढे निश्चित ध्येय नव्हते. त्यांच्यात एकजूट नव्हती. बरेचसे भारतीय इंग्रजांना फितूर झाले होते. सर्व संस्थानिक उठावात सामील झाले नव्हते.

या उठावाने भारतीय इतिहासाला कलाटणी मिळाली. हिंदुस्थानचा राज्यकारभार ईस्ट इंडिया कंपनीकडून इंग्लंडच्या संसदेकडे सोपविण्यात आला. इंग्लंडचा राजा हिंदुस्थानचा बादशहा झाला. कंपनीचे 'बोर्ड ऑफ कंट्रोलख्र रद्द करून 'इंडिया कौन्सिलख्र नेमण्यात आले. सैन्याची पुनर्रचना करण्यात आली. संस्थानिक व सरकार ह्यांच्यातील संबंध सुधारण्याचे प्रयत्न झाले. उठाव शमल्यानंतर कॅनिंगने शांतता प्रस्थापित केली. गव्हर्नर जनरल कॅनिंग हा पहिला व्हाइसरॉय झाला.

पुढील काळातील भारतीय स्वातंत्र्यसंग्रामात या उठावाची पहिले स्वातंत्र्ययुद्ध म्हणून स्मृती जागी ठेवण्यात आली. १९५७ मध्ये भारतभर १८५७ च्या उठावाचा शतसांवत्सरिक उत्सव साजरा करण्यात आला.

दैनिक माणदेश एक्सप्रेस हे पत्रक श्री. शशिकांत बापूसाहेब कुंभोजकर यांनी प्रकाशक, मालक श्री. दीपक गौतम प्रक्षाळे यांच्यासाठी कुंभोजकर ऑफसेट प्रिंटर्स, २६२, महावीरनगर, सांगली. पीन ४१६४१६ महाराष्ट्र येथे छापून विठ्ठलनगर, आटपाडी, ता. आटपाडी, जि. सांगली पिन- ४१५३०१ महाराष्ट्र येथून प्रसिद्ध केले. या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या, लेख, जाहिराती इ. विषयी संपादक, मुद्रक, प्रकाशक, मालक सहमत असतीलच असे नाही. RNI Reg.No- MAHMAR/2017/77021 (आटपाडी न्यायकक्षेत)

दैनिक
माणदेशी बुलंद आवाज...
# माणदेश एक्सप्रेस






# दिव्यांग कल्याण विभाग दिव्यांगांच्या दारी

## अभियानाचा लाभ घ्यावा : जिल्हाधिकारी डॉ. राजा दयानिधी

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**सांगली :** दिव्यांग कल्याण विभाग दिव्यांगांच्या दारी अभियानाचे येत्या २४ ऑगस्टला नियोजन करण्यात आले आहे. धनंजय गार्डन, कर्नाळ रोड येथे सकाळी ११ वाजल्यापासून हे अभियान होणार आहे. या अभियानात गरजेनुसार दिव्यांगांची आरोग्य तपासणी करून त्यांना शासकीय योजनांचा फायदा घेण्यासाठी आवश्यक असणारी प्रमाणपत्रे प्रातिनिधीक स्वरूपात दिली जाणार आहेत. तरी दिव्यांग बांधवांनी या अभियानाचा मोठ्या प्रमाणावर लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हाधिकारी डॉ. राजा दयानिधी यांनी येथे केले.

या अभियानाच्या तयारीच्या आढावा बैठकीच्या अध्यक्षस्थानावरून ते बोलत होते. जिल्हाधिकारी कार्यालयात झालेल्या या बैठकीस निवासी उपजिल्हाधिकारी आशिष बारकुल, महानगरपालिका उपायुक्त स्मृती पाटील, जिल्हा समाजकल्याण अधिकारी बाळासाहेब कामत, मंजिरी देशपांडे यांच्यासह विविध शासकीय विभागांचे व महामंडळांचे अधिकारी, प्रतिनिधी उपस्थित होते.



**सांगली : येथे जिल्हाधिकारी कार्यालयात दिव्यांग कल्याण विभाग दिव्यांगांच्या दारी अभियान च्या बैठकीत मार्गदर्शन करताना जिल्हाधिकारी डॉ. राजा दयानिधी**

दिव्यांगांच्या तक्रारींचा त्याच ठिकाणी निपटारा करण्याठी हे अभियान होत असल्याचे सांगून जिल्हाधिकारी डॉ. राजा दयानिधी म्हणाले, हे अभियान यशस्वी करण्यासाठी महानगरपालिका, जिल्हा परिषद व नगरपालिका निहाय नोडल अधिकारी तसेच दिव्यांगांची व्यवस्था पाहण्यासाठी क्षेत्रनिहाय कर्मचारी नेमावेत. दिव्यांग बांधवांची ने - आण करण्यासाठी वाहन व्यवस्था, पाणी व भोजन व्यवस्था, अन्य आवश्यक सोयी सुविधा, रँप, प्रथमोपचार पेटी, स्वच्छतागृहे, व्हील चेअर आदि बाबींचे काटेकोर नियोजन करावे. आवश्यक निधी, स्टॉलची उभारणी याबाबत जिल्हा परिषद व महानगरपालिकेने व्यवस्था पाहावी, असे त्यांनी सूचित केले.

दिव्यांगांना दैनंदिन जीवनात बऱ्याच अडचणींचा सामना करावा लागतो. त्यांच्या तक्रारी, अडीअडचणींचा निपटारा होऊन शासकीय योजनांचा फायदा घेण्यासाठी आवश्यक असणारी प्रमाणपत्रे सुलभरीत्या प्राप्त होण्यासाठी हे अभियान फायदेशीर ठरणार असल्याचे यावेळी जिल्हाधिकारी डॉ. राजा दयानिधी यांनी सांगितले.

या अभियानात जिल्हाधिकारी कार्यालय, महानगरपालिका, तसेच शासनाच्या नियंत्रणाखालील महामंडळे व इतर संस्था यांचे स्टॉल लावून एकाच छताखाली केंद्र व राज्य शासनाच्या विविध योजनांचा लाभ देण्यात येणार आहे. दिव्यांगांना आवश्यक असणारी प्रमाणपत्रे, दाखले, योजनांची माहिती व इतर अनुषंगिक सुविधा देण्यात येणार आहेत.

# उरमोडीचे पाण्याने राऊतवाडी बंधारा भरून द्या

## विजय सिन्हा : अन्यथा नदी पात्रातील स्मशानभूमीजवळ उपोषण करणार

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**म्हसवड/अहमद मुल्ला :** उरमोडीचे पाणी म्हसवड येथील राऊतवाडी बंधारा भरण्यासाठी सोमवार पर्यंत न सोडल्यास उरमोडीच्या पाण्यासाठी उपोषण करणार असल्याचे निवेदन सातारा जिल्हा अधिकारी यांना विजय सिन्हा यांनी दिले आहे.



विजय सिन्हा

माण तालुक्यातील दुष्काळी परिस्थितीत येथील नागरिकांना व पशुधनाला दिलासा देण्यासाठी गत आठवड्यात उरमोडीचे पाणी काही भागात सोडण्यात आले. त्यामध्ये म्हसवड परिसरात माण नदीत काही प्रमाणात आले त्या पाण्याने रिंगावन पेठ यात्रा पटांगण मैदानालगतचा माण नदीवरील माणदेशी फौडशनने बांधलेला बंधारा भरला आणि उरमोडीचे पाणी बंद झाले. तेथून पुढे दोन किमी अंतरावरील राऊतवाडी बंधारा मात्र कोरडा ठणठणीत राहिला. त्यामुळे येथील जनावरांचे व नागरिकांचे प्रचंड हाल सुरु आहेत. उरमोडीच्या पाण्यासाठी येथील शेतकऱ्यांनी पैसेही भरले आहेत तरी राऊतवाडी बंधाऱ्यात पाणी नाही.

उरमोडीचे पाणी राऊतवाडी बंधाऱ्यात येत्या सोमवारपर्यंत न सोडल्यास येथील नदीपात्रातील स्मशानभूमीजवळ उपोषणाला बसणार असल्याचे निवेदन माजी नगराध्यक्ष व सामाजिक कार्यकर्ते विजय सिन्हा यांनी प्रशासनाला दिले आहे.




# संस्कृती सातपुते यांची सुनिल बनकर यांच्या निवासस्थानी भेट



**नातेपुते : दहिगाव येथील सुनिल बनकर यांच्या निवासस्थानी भेट दिल्यावर संस्कृती सातपुते यांचा सत्कार करताना बनकर कुटुंबीय**

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**नातेपुते/वार्ताहर :** माळशिरस तालुक्याचे आमदार राम सातपुते यांच्या सौभाग्यवती सौ.संस्कृती सातपुते यांनी भाजपा माळशिरस तालुका ओबीसी अध्यक्ष व सोशल मीडिया प्रमुख सुनिल बनकर यांच्या दहिगाव येथील निवासस्थानी सदिच्छा भेट दिली.

त्यावेळी त्यांनी शेतीमध्ये फेरफटका मारून शेतीची पाहणी केली. सुनिल बनकर यांचे काम व निष्ठा यांचे त्यांनी कौतुक केले. यावेळी सुनिल बनकर यांची आई अंजना बनकर व पत्नी अपर्णा बनकर यांच्या हस्ते त्यांचा सन्मान करण्यात आला.

# गणेशोत्सव मंडळांनी स्पर्धेत सहभागासाठी अर्ज करण्याचे आवाहन

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**सांगली :** पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभागाने गणेशोत्सवात उत्कृष्ट सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांना पुरस्कार देण्याचा निर्णय घेतला आहे. स्पर्धेत भाग घेण्यास इच्छुक असलेल्या सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांनी करावयाच्या अर्जाचा नमुना दि. ४ जुलै २०२३ च्या पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभागाच्या शासन निर्णयामधील परिशिष्ट-अ प्रमाणे आहे. या नमुन्यामध्ये माहिती भरून ती माहिती ऑनलाईन पध्दतीने पु.ल. देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी मुंबई यांच्या mahotsav.pldagmail.com या ई-मेल आयडीवर दि. ५ सप्टेंबर २०२३ पूर्वी सादर करावयाची आहे, असे जिल्हास्तरीय गणेशोत्सव पुरस्कार समिती अध्यक्ष तथा उपजिल्हाधिकारी (रोहयो) यांनी प्रसिध्दीपत्रकाव्दारे कळविले आहे.



या स्पर्धेत धर्मादाय आयुक्त यांच्याकडे नोंदणी केलेल्या किंवा स्थानिक पोलिसांकडे परवानगी घेतलेल्या किंवा स्थानिक स्वराज्य संस्था यांची परवानगी घेतलेल्या सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांना सहभागी होता येईल. सहभागी होणाऱ्या सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांची निवड शासनाने ठरवून दिलेल्या निकषांच्या आधारे करण्यात येईल. शासनाच्या निकषाप्रमाणे निवड होणाऱ्या पहिल्या ३ विजेत्या सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांचा राज्य शासनाकडून प्रथम क्रमांकास ५ लाख रूपये, व्दितीय क्रमांकास २ लाख ५० हजार रूपये व तृतीय क्रमांकास १ लाख रूपये या प्रमाणे पारितोषिक व प्रमाणपत्र देवून गौरव करण्यात येणार आहे.

जिल्हास्तरीय समितीने राज्यस्तरीय समितीकडे शिफारस केलेल्या जिल्ह्यातील प्रत्येकी एक सार्वजनिक गणेशोत्सव मंडळास २५ हजार रूपयांचे पारितोषिक व प्रमाणपत्र देवून गौरविण्यात येणार आहे. अधिक माहितीसाठी पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभागाचा दि. ४ जुलै २०२३ रोजीचा शासन निर्णय पाहावा, असे आवाहनही करण्यात आले आहे.

# विकसित भारत घडविण्यासाठी महाराष्ट्राची भूमिका महत्त्वाची : राज्यपाल रमेश बैस

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**मुंबई :** भारतीय स्वातंत्र्य लढ्याच्या इतिहासात महाराष्ट्राची भूमिका महत्त्वाची होती. या राज्याने स्वातंत्र्यलढ्याला नेतृत्व दिले. आता प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या स्वप्नातील विकसित भारत घडविण्यासाठी महाराष्ट्राची भूमिका महत्वाची राहील, असे प्रतिपादन राज्यपाल रमेश बैस यांनी येथे केले.



स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवी वर्षाचे समारोप पर्व, 'मेरी माटी, मेरा देश' अर्थात 'माझी माती, माझा देश' या अभियानानिमित्त राज्य शासनाच्या सांस्कृतिक कार्य विभागातर्फे आज सायंकाळी राजभवनातील दरबार हॉल येथे 'साद सह्याद्रीची, भूमी महाराष्ट्राची' आणि ३५० व्या शिवराज्याभिषेक वर्ष सोहळ्यानिमित्त शहाजीराजे भोसले यांच्या प्रतिमेवर आधारित पोस्ट तिकिटाचा अनावरण समारंभ आयोजित करण्यात आले होते. त्यावेळी राज्यपाल श्री. बैस बोलत होते.

यावेळी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार, विधानसभेचे अध्यक्ष ड. राहुल नार्वेकर, सांस्कृतिक कार्य मंत्री सुधीर मुनगंटीवार, शालेय शिक्षण, मराठी भाषा मंत्री तथा मुंबई शहरचे पालकमंत्री दीपक केसरकर, मुख्य सचिव मनोज सौनिक, सांस्कृतिक कार्य विभागाचे प्रधान सचिव विकास खारगे, टपाल विभागाचे पोस्टमास्तर जनरल अमिताभ सिंह, राज्यपालांचे प्रधान सचिव संतोषकुमार आदी उपस्थित होते.

यावेळी मान्यवरांच्या हस्ते दर्शनिका विभागातर्फे प्रकाशित करण्यात आलेल्या मराठी भाषेतील महाराष्ट्र 'समाज सुधारक व विचारवंत आणि हिंदी भाषेतील 'स्वतंत्रता संग्राम मे महाराष्ट्र का योगदान' या पुस्तकांचे प्रकाशन करण्यात आले. तसेच कलावंतांनी देशभक्तीपर कार्यक्रम सादर केला.

राज्यपाल श्री. बैस म्हणाले की, भारतीय स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवी वर्षाच्या समारोपानिमित्त 'माझी माती, माझा देश' अभियान राबविण्यात आले. तसेच यंदाचे वर्ष छत्रपती शिवाजी महाराज यांच्या राज्याभिषेक सोहळ्याचे ३५० वे वर्ष साजरे केले जात आहेत. यानिमित्त विविध कार्यक्रम आयोजित केले जात आहेत.

सन २०४७ पर्यंत देशाला विकसित देश बनवण्याची प्रतिज्ञा आपण घेतली आहे. विकसित भारतासाठी महाराष्ट्राची भूमिका महत्वाची राहणार आहे. देशातील गरिबी, भूकबळी संपविण्यासाठी तरुण आणि महिलांचे सक्षमीकरण केले पाहिजे. कौशल्याला वाव दिला पाहिजे. त्यासाठी राज्यात कौशल्य विद्यापीठाचे बळकटीकरण केले पाहिजे. त्यातून महाराष्ट्र ही स्टार्टअपची राजधानी होईल. त्यासाठी विज्ञान व तंत्रज्ञानाची मदत घ्यावी. विकसित भारतासाठी प्रत्येक विभागाने आपले उद्दिष्ट निश्चित केले पाहिजे, असेही त्यांनी सांगितले.


सांस्कृतिक विभागाचे प्रधान सचिव श्री. खारगे यांनी प्रास्ताविकात 'मेरी माटी, मेरा देश' उपक्रमांतर्गत राबविण्यात आलेल्या उपक्रमांची सविस्तर माहिती दिली. पोस्ट मास्तर जनरल. श्री. सिंह यांनी मनोगत व्यक्त केले. यावेळी उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील, विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.

# महाराष्ट्र कॅसिनो कायदा रद्द

माणदेश एक्सप्रेस न्युज

मुंबई : महाराष्ट्र कॅसिनो कायदा रद्द करण्याचा निर्णय मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे होते.

राज्य शासनाने महाराष्ट्र कॅसिनोज (नियंत्रण आणि कर) अधिनियम, १९७६ पारीत केला आहे. मात्र जवळपास ४५ वर्षे होऊन देखील तो अंमलात येऊ शकलेला नाही. या अधिनियमाची अंमलबजावणी राज्यात करावयाची किंवा कसे या संदर्भात वरिष्ठ पातळीवर साधक-बाधक विचारविमर्श होऊन महाराष्ट्रासारख्या राज्यात अशा स्वरुपाचा कायदा अंमलात आणण्यात येऊ नये, अशी भूमिका घेण्यात आली आहे. त्यानुषंगाने महाराष्ट्र कॅसिनोज (नियंत्रण आणि कर) अधिनियम, १९७६ हा कायदा निरसित करण्याबाबतचा प्रस्ताव आज मंत्रिमंडळ बैठकीमध्ये ठेवण्यात आला होता. या बैठकीमध्ये हा कायदा निरसित करून त्यानुषंगाने विधिमंडळास विधेयक सादर करण्यास मान्यता देण्यात आली आहे.






# म्हसवड बस स्थानकासाठी अजिनाथ केवटे यांचे आंदोलन सुरु

## आंदोलनाचा सलग पाचवा दिवस : आंदोलनाला शहरातील अनेकांचा पाठींबा

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**म्हसवड/अहमद मुल्ला :** म्हसवड एस.टी स्टँड चे रखडलेले अर्धवट बांधकाम पूर्ण करावे यासाठी रिपब्लीकन सेनेचे माण तालुका अध्यक्ष अजिनाथ लक्ष्मण केवटे यांचे सलग पाचव्या दिवशी आंदोलन असून असून या आंदोलनाला म्हसवड शहरातील अनेक मान्यवरांनी भेट पाठींबा दिला आहे.

माण तालुक्यातील सर्वात मोठे व एकमेव नगरपालिका असणारे म्हसवड शहर असून या ठिकाणी प्रसिद्ध व जागृत श्री सिद्धनाथ देवस्थान दर्शनाला महाराष्ट्राच्या काना कोपऱ्यातून लाखो भाविक येत असतात. प्रत्येक रविवारी दर्शनासाठी भाविकांची गर्दी असते.

अशा या नावलौकीक प्राप्त शहरातील



म्हसवड : येथे बस स्थानकाचे रेंगाळलेले काम त्वरीत सुरु करावे यासाठी अजिनाथ केवटे यांचे सुरु असलेले आंदोलन

बस स्थानकाची अवस्था अतिशय दयनिय अशी झाली असून प्रवाशांना याठिकाणी कोणत्याही सोई सुविधा उपलब्ध नाहीत. जुने बसस्थानक पाडून नविन इमारत बांधकामास सुरुवात केली. मात्र ठेकेदाराने काम अर्धवट ठेवून निघून गेला. त्यावेळेपासून जवळपास पाच सहा वर्षापासून हे काम तसेच पडून आहे.

या अर्धवट बांधकामामुळे प्रवाशांना कुठल्याही प्रकारची सुविधा उपलब्ध नाही. उन्हाळ्यात उन्हात उभे रहावे लागते. पावसाळ्यात शालेय येणारे विद्यार्थी यांना चिखलात उभे रहावे लागत आहे. गटरीचे पाणी, पावसाचे पाणी साचून दुर्गंधी मुळे प्रवाशांचे खुप मोठ्या प्रमाणात हाल होत आहेत. त्यामुळे अपूर्ण बांधकाम त्वरीत सुरु करण्यात यावे याकरीता अजिनाथ केवटे यांनी १४ ऑगस्ट २०२३ पासून बेमुदत आंदोलन सुरु केले.

सलग पाच दिवस झाले हे आंदोलन सुरु असून या आंदोलनाला सर्व स्तरातून मोठ्या प्रमाणात पाठिंबा मिळत असून या बस स्थानकाचे प्रत्यक्षात काम जोपर्यंत सुरु होत नाही तोपर्यंत हे आंदोलन मागे घेणार नसल्याचे अजिनाथ केवटे यांनी सांगितले.

# भावा-भावांच्या प्रेमामुळे कुटुंब टिकेल : श्रीकृष्ण महाराज भगत



नातेपुते : येथे कै.विठ्ठलराव पंढरीनाथ रुपनवर यांच्या दुसऱ्या पुण्यस्मरणाच्या निमिताने श्रीकृष्ण महाराज भगत यांचे कीर्तन संपन्न झाले. यावेळी त्यांचा सन्मान करताना उपस्थित मान्यवर

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**नातेपुते/वार्ताहर :** भावा-भावांचे प्रेम टिकले तर, कोणत्याही संकटाला सामोरे जाता येते व कुटुंब ही टिकून राहते असे प्रतिपादन नातेपुते रूपनवर वस्ती येथील हणमंत पंढरीनाथ रुपनवर यांचे बंधू कै.विठ्ठलराव पंढरीनाथ रुपनवर यांच्या दुसऱ्या पुण्यस्मरणाच्या निमित्ताने ह.भ.प. श्रीकृष्ण महाराज भगत नातेपुते यांनी केले.

नातेपुते येथे कै.विठ्ठलराव पंढरीनाथ रुपनवर यांच्या दुसऱ्या पुण्यस्मरणाच्या निमित्ताने ह.भ.प. श्रीकृष्ण महाराज भगत नातेपुते यांचे कीर्तन संपन्न झाले. पुढे बोलताना ते म्हणाले, तुकोबाराय आपल्याला सांगतात, बाबा, नामामध्ये सार आहे. त्याच्यात आपलं हित आहे. आपण नाम घेतल्याने आपला उद्धार नक्कीच होईल. सध्याची स्थिती आपल्यासमोर आहे. त्यात आपल्याला सिद्ध झालेच पाहिजे आणि नामस्मरण घेतले पाहिजे असेत्र सांगून यावेळी पसायदान आरती होऊन महाप्रसाद संपन्न होऊन कार्यक्रमाची सांगता झाली.

# चारा, वैरण, पिण्याचे पाण्याचे नियोजन करा

### कमी पावसाच्या पार्श्वभूमीवर प्रशासनास मंत्रिमंडळाच्या सूचना

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**मुंबई :** राज्यात सरासरीच्या ८९ टक्के पाऊस झाला आहे. मागील वर्षी सरासरीच्या १२२.८ टक्के पाऊस झाला होता. पुढील काही दिवसात हवामान विभागाने राज्यात पावसाची शक्यता वर्तवली आहे. याअनुषंगाने कृषी तसेच महसूल व संबंधित विभागांनी नियोजन करावे तसेच चारा, वैरण, पिण्याचे पाणी या अनुषंगाने योग्य ते नियोजन तयार ठेवावे, अशा सूचना मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिल्या.

कृषी विभागाने आज बैठकीत माहिती दिल्याप्रमाणे राज्यात १३९.३५ लाख हेक्टर क्षेत्रावर म्हणजेच ९१ टक्के पेरणी झाली आहे. १०० टक्क्यांपेक्षा जास्त पाऊस झालेले ६ जिल्हे असून, ७५ ते १०० टक्के पाऊस झालेले १३ जिल्हे आणि ५० ते ७५ टक्के पाऊस झालेले १५ जिल्हे आहेत. राज्यात २५ ते ५० टक्के पाऊस झालेले १३ तालुके आहेत.

सध्या राज्यातील मोठे, मध्यम व लघु पाटबंधारे प्रकल्पात ६१.९० टक्के पाणीसाठा असून गेल्या वर्षी याच सुमारास ८०.९० टक्के पाणीसाठा होता. नागपूर विभागातील धरणांमध्ये सध्या ७०.४७ टक्के, अमरावती ६६.५७ टक्के, औरंगाबाद ३१.६५ टक्के, नाशिक ५७.१६ टक्के, पुणे ६८.२३ टक्के आणि कोकण ८७.२५ टक्के अशी पाणी साठ्याची स्थिती आहे. सध्या राज्यात ३२९ गावे आणि १२७३ वाड्यांमधून ३५१ टँकर्स सुरु आहेत.

# मंडणगड येथे दिवाणी न्यायालय

माणदेश एक्सप्रेस न्युज

मुंबई : रत्नागिरी जिल्ह्यातील मंडणगड येथे ग्राम न्यायालयाऐवजी दिवाणी न्यायालय, कनिष्ठस्तर व न्याय दंडाधिकारी, प्रथम वर्ग न्यायालय स्थापन करण्याचा निर्णय मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे होते. या न्यायालयासाठी ७ नियमित पदे निर्माण करण्यास आणि ४ पदांच्या सेवा बाह्य यंत्रणेद्वारे घेण्यास मान्यता देण्यात आली. यासाठी ७१ लाख ७६ हजार ३४० इतका वार्षिक खर्च येईल.

# संसदेपर्यत महिला, वंचितांना निर्णायक आरक्षण द्या : सादिक खाटीक

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**विटा :** प्रगतीपासून कोसो दुर असणाऱ्या महिला, वंचित, उपेक्षित, मागासांच्या सर्वांगीण विकासासाठी, त्यांना विकासाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी विधानपरिषद, राज्यसभेच्या सर्व जागा आणि ग्रामपंचायती पासून लोकसभेपर्यंतच्या ५० टक्के जागा आरक्षित करा.असे आवाहन राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी अल्पसंख्याक विभागाचे प्रदेशचे महासचिव आटपाडीचे सादिक खाटीक यांनी केले आहे.

अग्रणी सोशल फौंडेशन विटा यांच्यावतीने वंचित घटक व महिलांचा, शासन प्रशासनामधील सहभाग वाढवण्यासाठी उपाययोजना, या विषयावर एक दिवशीय कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. या कार्यशाळेचे उदघाटन सादिक खाटीक यांच्या हस्ते करण्यात आले.

त्याप्रसंगी सादिक खाटीक बोलत होते.प्रमुख अतिथी म्हणून ॲड. शौर्या पवार विटा, वैशाली रायते कराड आणि अध्यक्ष म्हणून वैभव शिक्षण संस्थेतील प्रा.दत्तात्रय गायकवाड विटा हे उपस्थित होते.

सादिक खाटीक पुढे म्हणाले, सत्तेचे विक्रेंद्रीकरण करत महिलांना संसदेपर्यत ५० टक्के आरक्षण दिले पाहीजे. लोकसंख्येनुसार त्या त्या जात समुहाला आरक्षणाची संधी दिली पाहीजे. लोकांमधून निवडून दिल्या जाणाऱ्या ग्रामपंचायतीसह सर्व स्थानिक स्वराज्य संस्थाच्या पासून विधानसभा, लोकसभा सदस्यांच्या सर्वच जागा दुप्पट करून उपेक्षित, वंचित, मागास, अल्पसंख्याक घटकांना , महिलांना योग्य त्या प्रमाणात प्रतिनिधीत्व मिळण्यासाठी ५० टक्के इतक्या जागा आरक्षीत ठेवल्या पाहीजेत. राज्यसभेचे सर्व सदस्य उपेक्षित, वंचित, मागास, महिला, अल्पसंख्याक, भटके, विमुक्त इत्यादी वंचितांमधूनच निवडले गेले पाहिजेत , नियुक्त केले पाहीजेत. देशभरातल्या प्रत्येक राज्यात, विधानपरिषद निर्माण करून त्यातील सर्व जागा वंचित, उपेक्षित, मागास, अल्पसंख्याक, भटके विमुक्त, एस.सी.एस.टी. वर्गवारीतल्यां साठीच आरक्षीत असल्या पाहीजेत.तरच हे उपेक्षित वंचित समाज घटक खऱ्या अर्थाने मुख्य प्रवाहात येतील. सर्वांगीण व चौफेर प्रगती साधतील.देशातल्या सर्वच राजकीय पक्षांनी, नेत्यांनी हे सर्व समावेशक प्रतिनिधीत्वाचे वंचित, उपेक्षितांचे स्वप्न सत्यात आणावे.



विटा : येथे अग्रणी सोशल फौंडेशन यांच्या वतीने घेण्यात आलेल्या एक दिवशीय कार्यशाळेस उपस्थित मान्यवर

इस्लामपूरच्या जयंत दारीद्रय निर्मूलन पॅटर्नने २००६ पासून गत १७ वर्षात शासनाच्या विविध योजनांतून वाळवा तालुक्यातील सर्व स्तरातील ५८२४५ लाभार्थ्यांना ४४ कोटी ६० लाख २९८६ रुपयांच्या सुविधांचा लाभ मिळवून दिला आहे. ४३१ कुटुंबांना दारीद्रय रेषेच्या वर आणण्याचे काम केले गेले आहे. हे सर्व माजी मंत्री आमदार जयंतराव पाटील यांच्या सर्वसामान्याप्रती असलेल्या आस्थेतुन घडले आहे. इस्लामपुरचा हा, जयंत दारीद्रय निमुर्लनाचा पॅटर्न देशभर राबविल्यास भारत आणखी जोमाने विकास करू शकेल. छोट्या बचतीच्या सकल्पनेतून जयंत दारिद्रय निर्मूलनाचा पॅटर्न खानापूर, आटपाडी तालुक्याबरोबर विसापूर सर्कल मधील सर्व गावांसाठी यशस्वीपणे राबवला जावू शकतो, यावर सर्वानी साकल्याने विचार करावा. असे आवाहन सादिक खाटीक यांनी केले.

सर्व प्रकारचे शिक्षण, आरोग्य सुविधा फक्त शासकीय व्यवस्थांमधूनच तेही मोफत दिले पाहीजे. शिक्षण घेऊन परदेशी जाणार्यावर बंदी घातली पाहीजे. सर्व धर्मीयांच्या धार्मीक व्यवस्थांमधला पैसा सरकारने ताब्यात घेऊन देशासाठी वापरला पाहीजे. सौरउर्जा, बांबु लागवड व बांबुवर आधारीत उद्योगांची सर्व देशभर खेड्यापाड्या मध्ये उभारणी केली पाहीजे. सावलीत बसून दोन तीन तास काम करून गलेलठ्ठ पगार घेणाऱ्यांकडून जेवढा दाम तेवढ्या प्रमाणात काम करून घेतले पाहीजे. सार्वजनिक सुट्ट्यांवर मोठे निर्बंध आणले पाहीजे. सेवानिवृत्तीच्या वयापासून प्रत्येक भारतीयाला पंधरा हजार रुपये पेन्शन दिली पाहीजे. असे अनेक महत्वपूर्ण बाबींवर सादिक खाटीक यांनी शेवटी भाष्य केले.

महापुरुषांची केली जात असलेली निंदा नालस्ती, संविधान, तिरंगा ध्वज, स्वातंत्र्य दिन विरोधी वक्तव्ये करणाऱ्या देशद्रोह्यांना तुरुंगात डांबण्या ऐवजी सरकार अशांना संरक्षण देत पाठीशी घालत आहे. बहुमताच्या जोरावर मनुस्मृती समर्थकांना आवश्यक आणि बहुजनांना,संविधानाला मारक असे कायदे केले जात आहे. हुकुमशाही वृत्तीच्या या मनमानीतुन मनुस्मृतीवर आधारीत विचारधारा देशवासीयांच्या माथी थोपवण्याचा सुरू असलेला प्रयत्न सर्वांनी मोडून काढला पाहीजे. असे मत आघाडीच्या सामाजीक कार्यकर्त्या ॲड. शौर्या पवार यांनी व्यक्त केले.

यावेळी प्रा.दत्ता गायकवाड, वैशाली रायते यांनी सखोल मार्गदर्शन केले. कार्यक्रमास सुहासिनी शिंदे, करीना मुल्ला, पाकीजा शिकलगार, शोभा लोंढे, पुनम चंदनशिवे, मुनीर शिकलगार, आप्पासाहेब माने, विशाल भिंगारदिवे, सागर माने, मनिषा गुजले, देवकुमार दुपटे, दीपक पवार, शुभांगी भोसले, रेवणसिद्ध कांबळे, चंद्रशेखर गायकवाड, बालाजी गायकवाड, सदाशिव देवकर, समीर मुल्ला, बाबु खाटीक, सलीम वंजारी, नदिम खाटीक, साहेबराव कदम, सुनिता गडदरे, दादा वाक्षे, विश्वजीत सरगर सुहासिनी शिंदे उपस्थित होते.





